दुसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोग
महाराष्ट्र दौरा, "राज्य अतिथी" घोषित
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : एचसीटी-१२१७/७/प्र.क्र.१०/का.३,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सी) क्र.६४३/२०१५ प्रकरणासंदर्भात दि.०९.०५.२०१७ च्या आदेशान्वये श्री.पी.व्ही.रेड्डी, अध्यक्ष, सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.सर्वोच्च न्यायालय आणि श्री.आर बसंत, सदस्य, सेवानिवृत्त न्यायाधीश केरळ उच्च न्यायालय यांचा आयोग गठित केला आहे. सदर आयोगाला जिल्हा न्यायालय व त्याच्या अधिनस्त न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या वेतन संरचना, भत्ते व सेवानिवृत्तीनंतरचे फायदे इत्यादी बाबींचा आढावाघेऊन शिफारशी करावयाच्या आहेत. त्यानुषंगाने दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाचे अध्यक्ष तथा सदस्य तथा अधिकारी हे शासकीय कामकाजासाठी महाराष्ट्र राज्यांच्या दौऱ्यावर येणार आहेत. सदर दौऱ्यांच्या कालावधीत न्यायिक अधिकाऱ्यांच्या समस्यांबाबत चर्चा करणार आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाने आयोगाच्या अध्यक्षांना मा.सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाप्रमाणे वेतन व भत्ते व आयोगाच्या सदस्यांना मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे वेतन व भत्ते प्रदान करण्याचे आदेशित केले आहे. त्यामुळे आयोगाच्या अध्यक्षांना मा.सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश व सदस्यांना मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा समकक्ष दर्जा असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर उक्त सन्माननीय महोदयांना "राज्य अतिथी" म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शासन निर्णय -

राज्य शासन, मा.अध्यक्ष, सदस्य तथा अधिकारी, दुसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोग यांना महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्याच्या कालावधीत "राज्य अतिथी" म्हणून घोषित करीत आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या, क्र.एसजीआर-१००२/६८८/सीआर-९२/३१, दि. ०१ जानेवारी, २००४ च्या अधिसूचनेन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार मा.अध्यक्ष, सदस्य तथा अधिकारी यांच्या भेटीच्या व्यवस्थेवरील सर्व खर्च विधि व न्याय विभागाकडून करण्यात येईल व **"विधि व न्याय विभाग, मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालय, सर्वसाधारण सेवा, (००)(०९०) सचिवालय, (००) (०१) विधि व न्याय विभाग-आस्थापना (२०५२ ०२५९)"** या लेखाशिर्षामधून भागविण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार कक्षाने याबाबतची देयके विधि व न्याय विभागाकडे प्रतिपुर्तीसाठी पाठवावीत.

३.   सदर शासन निर्णय, राजशिष्टाचार (सा.प्र.वि.) विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २७६/२०१८/३० (रा), दि.२९/०१/२०१८अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०२२३१६४९२८६९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh
Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.02.23 16:51:39 +05'30'

(अ.श्या.कलोती)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.राज्यमंत्री (विधि) यांचे प्रधान सचिव,
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
५. प्रधान सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
६. अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
१२. श्री. विनय कुमार गुप्ता, सदस्य सचिव, दुसरा न्यायिक वेतन आयोग, नवी दिल्ली.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. महालेखापाल-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६. महालेखापाल-१ /२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई,
१८. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई,
१९. सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, महाराष्ट्र राज्य,
२०. प्रमुख न्यायाधीश, सर्व कौटुंबिक न्यायालये,
२१. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई,
२२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२३. व्यवस्थापक, सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई
२४. विधि व न्याय विभागातील सर्व शाखा व कार्यासने,
२५. निवड नस्ती/कार्यासन-३.